सांकेतांक क्र 19900418

क्रमांक एल. आर. ११५३/ल-२
पुणे, दिनांक : १८-४-१९९०

विषय — पोटहिस्सा मोजणी व पोटहिस्सा
मोजणी फी वसुली बाबत

# परिपत्रक —

महसूल विभागाकडून प्राप्त झालेल्या नवीन पोटहिश्यांची यादी प्राप्त झालेवर भूमि अभिलेख खात्याकडून पोटहिस्सा मोजणी काम केले जाते. त्या करिता अशा पोटहिस्सा मोजणी कामी निवडलेल्या गांवातील जमीन धारकांना पोटहिस्सा मोजणी सुरु करण्यात येत असल्याबाबत व मोजणी कामी जरुर ती मदत देणे व उपस्थित राहून माहिती देणेबाबत आगावू सर्व सामान्य नोटीस देणेत यते. त्यानंतर ज्या स. नं. मधील हिश्यांची मोजणी करणेची आहे अशी स. नं. मधील पोटहिस्सा धारकांना मोजणी तारीख व वेळ देवून मोजणी वेळी उपस्थित रहाणे कामी व्यक्तिगत नोटीसा देण्यात येतात.( पहा म. ज. अ (महसूली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम १९७९ मधील नियम १५ (१) व (२) व त्यानंतर पोटहिस्सा भूमापक जागेवरील परिस्थिती प्रमाणे मोजणी करतात. सदर मोजणी वेळी बहुधा कांही जमीन धारक हजर रहात नाहीत. त्यामुळे सदर मोजणी वेळी जे धारक हजर असतील त्यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या वहिवाटी प्रमाणे मोजणी केली जाते व हिस्सा फॉर्म नं. ४ मध्ये गुणाकार बुकावर धारकाचे नांव व माहिती देणाराचे नांव नमूद करुन हजर धारकांच्या सह्या घेतल्या जातात. गांवचे अधिकार अभिलेखात कामगार तलाठी म. ज. म. अ. १९६६, कलम १४९ अन्वये मिळालेल्या माहितीवरुन वारसा हक्काने, विभागणीने खरेदीने किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क संपादन केल्या-वरुन संबंधीत धारकाने दिलेल्या माहिती वरुन अधिकार अभिलेखात नोंदी करतात व जरुर तेथे स हिस्से पाडून ७X१२ चे नवीन पान उघडतात. सदर नवीन पडलेल्या पोटहिश्यात तलाठी संबंधीतानी दिलेल्या माहिती वरुन किंवा खरेदीखातात नमूद क्षेत्राप्रमाणे क्षेत्र नमूद करतात सदरचे नवीन पोटहिश्याचे क्षेत्र मोजणी अंती दाखल केलेले नसते. त्यामुळे जागेवरील प्रत्यक्ष वहिवाटीने येणारे क्षेत्र व ७X१२ स नमूद असलेल्या क्षेत्रात तफावत येते व पोटहिस्सा समयी जे धारक हजर नसतील ते धारक नंतर कमी/जास्त क्षेत्राबाबत नतर तक्रार करतात. तसेच पोटहिस्सा मोजणी वेळी मिळालेल्या माहितीचे आधारे गुणाकार बुकात व नंतर हिस्सा फॉर्म नंबर ११ व १२ तयार केल्यानंतर फाळणी बारा गांवी अंमल घेण्यासाठी पाठविला जातो त्यावेळी तलाठयाने नावाबाबत खात्री करुन अधिकार अभिलेखास अंमल घेणेचा आहे असे हि. नं. १२ वर स्पष्ट टीप दिलेली असते, म्हणून तलाठयांनी नावांबद्दल चौकशी केलें शिवाय नोंद घेऊ नये.

याशिवाय अशा पोटहिस्सा मोजणी कामी, शासनाची फार मोठया प्रमाणावर रक्कम वसुलीवर शिल्लक राहिलेली आहे. तरी पोटहिस्सा मोजणी रक्कम वसुलीवर शिल्लक राहिलेली आहे. तरी पोटहिस्सा मोजणी काम बिनचूक होणे व शासनाचा खर्चही आगावू वसूल होणे आवश्यक आहे, त्याकरिता यापुढें पोटहिस्सा मोजणी कामी खालील प्रमाणें पद्धत अनुसरांवी,

ज्यावेळी स. नं. मध्ये खरेदी, विक्रीने, वाटपाने, वारसाने किंवा इतर कोणत्याहीं प्रकारे पोटहिस्से पडतात व त्यांची वर्दी संबंधीत धारकानी दिल्यावर कामगार तलाठी यांनीं अधिकार अभिलेखात नोंद घेताना, कोणत्याही स. नं. मध्ये व त्यातील हिश्यात जर पोटहिस्सा पडत असेल तर नवीन ७X१२ चें पान न उघडताच त्या त्यास स. नं. अगर स. नं. मधील पोटहिश्याचे ७X१२ स नोंदी समाईकांत घ्याव्यात व संबंधीत धारकांकडून संबंधीत स. नं. / हिश्यांचा ७X१२ व सदर ७X१२ वरील समाईकांत नांवे असलेल्या सर्व धारकांची नांवे व पत्ते व मोजणी कामी संमती घेवून मोजणीं अर्ज घ्यावा. सदर अर्ज व त्याचप्रमाणे २ स. नं. अगर ६ पोटहिस्सा पर्यन्त मोजणी फी २५०/- रु. घेवून त्यांची पावती खातेदारास देवून नंतर ००२९ एल. आर. या लेखा शिर्षकाखाली चलनाने २५०/- रुपये भरावेत व सदरचे चलनाची पहिलीप्रत खातेदाराचा अर्ज संमती जबाब यासह मोजणी यादी जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख / भूमापन तहसिलदार ( पो. हि. ) यांचकडे पाठवावी.

वरील प्रमाणे अर्ज प्राप्त झालेनंतर जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख / भूमापन तहसिलदार ( पो. हि. ) कार्यालयातील भूकरमापक यांनी रीतसर आगावू नोटीस संबंधीत सर्व खातेदारांना देवून त्याचप्रमाणे मजूर वगैरे बाबत मदत देण्याच्या सूचना देवून मोजणीसाठी गांवी जावे. मोजणी कामी अर्ज दिल्यामुळे, तसेच आगावू मोजणी

S-47

फी भरली असलेमुळे व मोजणी झाले शिवाय ७x१२ चे स्वतंत्र पान होणार नाही याची माहिती आल्याने मोजणी समयी सर्व खातेदार उपस्थित रहातील, त्यांचे जमिनींच्या समक्ष वहिवाटी दाखवतील व त्यामुळे क्षेत्राच्या कमी-जास्ती बाबतच्या तक्रारीस वाव रहाणार नाही. तसेच गुणाकार बुकावर ( हि. फॉ. नं. ४ ) सर्व खातेदारांच्या सह्या मिळतील त्यामुळे मोजणी झालेल्या अशा सर्व प्रकरणीं काही अपुर्तता राहणार नाही व बरसात कालावधीत आकारफोडचे काम पूर्ण होवून फाळणी बारा गांवी अधिकार अभिलेखांत नोंद घेण्यासाठी पाठवावा. सदर कार्यवाही मुळे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे पोटहिस्से पडणार नाहीत, तसेच भूमापकानेही प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे पोटहिस्से मोजू नयेत व फाळणी बारा प्राप्त झालेनंतरच कामगार तलाठी यांनी फाळणी बारानुसार नांवा-बद्दल रीतसर चौकशी करुन ७x१२ ची स्वतंत्र पाने करुन अधिकार अभिलेखास अंमल घ्यावा. वरील पद्धत अनुसरल्याने क्षेत्राबाबत / नावाबाबत जनतेच्या तक्रारी येणार नाहीत. त्यामुळे जनतेच्या तक्रारी दूर होतील व अशा तक्रारी कामी शासनाचा जाणारा वेळ वाचेल. त्याचप्रमाणे आगावू मोजणी फी वसूल केल्यामुळे शासनाची रक्कम वसुलीवर शिल्लक राहाणार नाही. मोजणी फी आगावू वसूल करणेबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक पुणें यांना महाराष्ट्र जमीन महसूल ( महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग ) नियम १९६९ मधील नियम३ (२) नुसार अधिकार देण्यांत आलेले आहेत.

सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी कार्यालयाकडून पोटहिस्सा मोजणी कामी तक्रारी अर्ज प्राप्त झालेवर संबंधीत सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी ६ पोट हिश्याकामी २५०/- रु. इकडील परिपत्र क्र. एल. आर. २२७/सी. आर. २०७३/क-३/८५ दिनांक १८-१०-८५ ने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे मोजणी फी वसूल करुन नंतर पोट हिस्सा मोजणी तपासणीचे काम करावे.

सही
जमाबंदी आयुक्त आणि
भूमि अभिलेख ( म. रा. ) पुणे.

प्रत - सर्व उपसंचालक भूमि अभिलेख
सर्व नियंत्रण अधिकारी
सर्व जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख
भूमापन तहसिलदार ( पो. हि. )
भूमापन तहसिलदार पुर्नमोजणी
सर्व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी
यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित

प्रत - सर्व उपविभागीय अधिकारी यांना माहितीसाठी अग्रेषित,

प्रत - सर्व तहसिलदार यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

S-48